# मायबोली मेळावा वृत्तपत्र

Mayboli Melava Tampa Bay

मायबोली मेळावा टॅम्पा बे

**वर्ष : सहावे; वृत्त: चौथे** **२ नोव्हेंबर २०१४**

newsletter@mmtbusa.org

**मायबोली मेळावा कार्यकरीणी २०१३- २०१४**

**अध्यक्ष**
सौ. वृषाली पेंढारकर
**उपाध्यक्ष**
डॉ. राहुल म्हसकर
**सचिव**
श्री. मायकेल डॅनिअल्स
**उपसचिव**
सौ. नयना वाबळे
**कोशाध्यक्ष**
श्री. समीर खानविलकर
**उपकोषध्यक्ष**
श्री. आशिष कुलकर्णी
**सांस्कृतिक कार्यक्रम**
सौ. मेधा फडणीस
सौ. नयना वाबळे
**भोजन व्यवस्था**
सौ. उत्तरा तांडेल
सौ. वृषाली पेडणेकर

**वृत्तपत्र संस्थापक:**
सौ. मंजुषा नाईक
**कार्यकारीणी सदस्य सहाय्य:**
सौ. मेधा फडणीस
**मांडणी सजावट सहाय्य :**
सौ. नूतन कुलकर्णी
**संपादक:**
तेजल कोळवणकर
सौ. राजश्री लिमये



नमस्कार मंडळी,

दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! अनंत चतुर्दशीला गणरायाला निरोप दिल्यावर वेध लागतात ते नवरात्र आणि दिवाळीचे ! आणि मग दिवाळीची नवीन खरेदी, दिवाळी पार्टी चे बेत सुरु होतात. पण यंदा मात्र Tampa Bay च्या मराठी मंडळींना वेध लागले होते ते ४ ऑक्टोबर ला येऊ घातलेल्या BMM महोत्सवाचे ! फ्लोरिडाची चार मराठी मंडळे एकत्र येउन BMM महोत्सव साजरा करण्याचा अभिनव उपक्रम योजलेला होता. आपली Tampa baych‍ी उत्साही मंडळी तर अशा कार्यक्रमांसाठी नेहमीच सरसावून तयार होतात. BMM महोत्सवसुध्हा याला अपवाद ठरला नाही. "शिवस्वराज्यगाथा" या कार्यक्रमातून आपल्या जवळजवळ ५० मंडळींनी BMM चे स्टेज दणाणून सोडले आणि MMTB च्या नावाची वेगळी ओळख सर्वांच्या मनात ठसवली.


BMM व्यतिरिक्त MMTB ने आयोजित केलेल्या अशा सांस्कृतिक आणि अन्य कार्यक्रमांमुळे यंदाचे वर्ष मायबोलीकरांसाठी संस्मरणीय ठरले यात दुमत नाही ! वर्षभर सादर होणारे निरनिराळे कार्यक्रम उत्कृष्टपणे पार पडावे यासाठी आपले कार्यकारीणी मंडळ अविरत मेहनत घेत असते. हा येणारा दिवाळी कार्यक्रम सध्याच्या कार्यकारीणी मंडळाचा शेवटचा कार्यक्रम ठरणार आहे. वैयक्तिक जबाबदार-या सांभाळून सर्व कार्यक्रम योजून यशस्वीपणे पार पाडणार-या या मंडळातील सर्व सदस्यांचे मन:पूर्वक आभार ! नवीन कार्यकारीणी मंडळात कोण कोण मंडळी असतील याची उत्सुकता तर मलाही लागून राहिली आहे. हा अंक तुम्हापर्यंत पोहोचेपर्यंत त्याचा उलगडा झाला असेल. नवीन कार्यकारीणी मंडळींची सविस्तर ओळख आणि गतवर्षीचा आढावा पुढील वर्षीच्या मकरसंक्रांत वृत्तपत्रात घेऊन आम्ही तुमच्या भेटीला येऊच !

# गणपती दिन वृत्तांत


आपल्या आवडत्या हिंदी चित्रपट सृष्टीला १०० वर्षे पुर्ण झाली. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' ह्या मूकपटाची निर्मिती केली. प्रथम मूक असणारा हा पडदा बोलू लागला पुढे गाऊही लागला. पुढेपुढे चित्रपतील गीते हा चित्रपटाचा अविभाज्य भाग बनली आणि चित्रपटापेक्षाही लोकप्रिय होऊ लागली. या वर्षी गणपती उत्सवाच्या निमित्ताने सादर झालेला कार्यक्रम "100 YEARS OF BOLLYWOOD" हा होता. यात १०४० पासून ते २०१४ पर्यंतच्या निवडक लोकप्रिय गीतांचा सुरेल प्रवास भारतातून आलेल्या श्री. मिलिंद ओक आणि त्यांच्या साथीदारांनी आपल्यासमोर सादर केला. कलाकारांनी सादर केलेल्या नृत्यगायनाच्या आविष्कारात सर्व मायबोलीकर पुरते रंगून गेले आणि टाळ्या, शिट्ट्या, Once More देत कलाकारांना उत्स्फुर्त दाद ही दिली.

हा कार्यक्रम HILLSBOROUGH COMMUNITY COLLEGE च्या उत्कृष्ट सभागृहात ६ सप्टेंबरला झाला. मायबोली मंडळातर्फे Babysitting ची सोयही करण्यात आल्यामुळे सर्व पालकांना ह्या अभिनव कार्यक्रमाची मजा घेता आली. यानंतर Indoor Sports Day च्या सर्व विजेत्यांना बक्षीसवाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अखेरीस आपल्या मायबोली परिवारातर्फे श्री. दिलीप चित्रे यांच्या “ बहिष्कार “ कवितासंग्रहाच्या प्रकाशनानिमित्त त्यांचे अभिनंदन केले गेले.

तर अशा ह्या संस्मरणीय आणि गोड मैफिलीचा शेवट बासुंदी पुरीच्या गोड जेवणाने झाला आणि आपली आवडती गाणी गुणगुणत मंडळींनी एकमेकांचा निरोप घेतला.



# ओळख उद्योजकांची



या सदरात आपण मायबोली परिवारातील व्यावसायिकांची ओळख करून घेणार आहोत. आपणही जर या परिवारातील व्यावसायिक असाल तर आपली माहिती आम्हाला अवश्य कळवा. आत्ता आपल्या परिवारातील व्यावसायिका सोनाली पाटील यांची ओळख आणि व्यवसायाची माहिती आपण त्यांच्याचकडून करून घेवूया.

२००९ ची गोष्ट आहे. रिअल इस्टेट मार्केट खूपच खाली गेले होते. मार्केट चा फायदा घेवून आम्ही नवीन घर घ्यायचा विचार केला. नवीन घर शोधायला मी इतकी उल्हसित झाले होते कि आमच्या रीअल्टरने घराची माहिती पाठवायच्याआधीच माझे संशोधन तयार असे ! माझी उत्सुकता दिवसेंदिवस वाढतच होती. मग घराचा मालक कोण आहे? त्याने कधी घर घेतले? कितीला घेतले ? आत्ता असेच घर बांधायचे झाले तर किती पैसे पडतील ह्या सगळ्या गोष्टींचा आढावा घ्यायला मी सुरुवात केली. पुढे जाऊन बाकी किती प्रकारचे खर्च लागतात आणि कर्ज घेताना कुठल्या गोष्टी जरुरी असतात, कर्ज कुठून घ्यायचे ह्या सगळ्या गोष्टींची माहिती काढली. आता हाच माझा छंद बनला होता आणी दिवसभराचा उद्योग सुद्धा ! आमच्या मित्र परिवारातले खूप जण घर घ्यायला निघाले होते. मी सगळ्या जवळच्या लोकांना तयार संशोधन पुरवायला चालू केले. त्यांच्या बजेट मध्ये चांगल्यात चांगले घर कमीत कमी पैश्यात कसे मिळवायचे, त्यांच्या आवडत्या परिसरात भाव काय चालू आहेत आणि शाळा कशा आहेत हे शोधण्याच्या दृष्टीने माझी वाटचाल चालू झाली.

घराच्या क्लोसिंगच्या दिवशी आमच्या रीअल्टरने माझ्या समोर प्रस्ताव ठेवला "तुझे संशोधन आणि उत्साह दांडगे आहे. रीअल्टर बनण्यासाठी जे काही लागते ते सर्व तुझ्यात आहे. तू माझ्या कंपनीत काम करशील का?" रीअल्टर????? मी कधी विचारच केला नव्हता.

माझे मन ९ वर्ष मागे गेले. कॉम्पुटर इंजिनीयर असून सुद्धा माझ्या लग्नाच्या वेळेस मी माझ्या नवऱ्याला सांगितले होते कि मला काही ह्या क्षेत्रात विशेष रुची नाही. कदाचित मी रीअल्टर होणार हेच माझ्या भाग्यात होते. थोडे दिवस विचार करून मी होकार दिला आणि माझे शिक्षण चालू झाले. लवकरात लवकर मी परीक्षा दिल्या आणि रिअल इस्टेटचा परवाना घेतला. मी रीअल्टर झाले !

२००९ हे माझ्या आयुष्यातील घडामोडीचे वर्ष होते. याच वर्षात मी माझा व्यवसाय बदलला होता ! खरं तर कॉम्पुटर हा माझा व्यवसाय कधी नव्हताच मुळी. मी सगळ्या मैत्रिणींना चांगल्यात चांगल्या कम्युनिटीत स्वस्तात स्वस्त घरं शोधून दिली. माझे नाव पसरायला लागलं. चांगलं घर हवं असेल तर सोनालीला सांगा!

चांगली घरं शोधण्याच्या माझ्या कलेने खूप गुंतवणूकदार आकर्षित झाले. फक्त स्थानिक ग्राहकच नव्हे पण खूप परप्रांती ग्राहक मला मिळाले. माझ्या प्रामाणिकपणाने आणि कष्टाने व्यापार चांगलाच फुलला. चांगला सौदा शोधायचा हे माझे passion बनले . माझ्या सगळ्या ग्राहकांनी माझ्यावर खूप विश्वास ठेवला. ह्या विश्वासाने मला बरेच अधिकार प्रदान केले. माझे परप्रांती ग्राहक तर घर बघायला सुद्धा येत नव्हते. मी फक्त सांगायची की हे घर ह्या किमतीला चांगले आहे आणि ते लगेचच ऑफर सही करून पाठवायचे. ज्या प्रकारचे फायदे माझ्या सल्ल्याने त्यांना मिळाले, ते अद्वितीय होते. त्यामुळे माझे बरेच ग्राहक कायमचे झाले आणि त्यांनी मला अजून खूप नवीन ग्राहक सुद्धा दिले.

माझे मुख्य ग्राहक न्यूयॉर्क, टेक्सास आणि शिकागोचे वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक आहेत जे बहुतांशी गुंतवणूकदार आहेत.

चांगल्या प्रतिसादामुळे आणि सगळ्यांच्या सल्याने , २०१४ मध्ये मी माझा स्वतःचा उद्योग चालू करण्याचा निर्णय घेतला. ह्या वर्षाच्या संक्रांतीला टॅम्पा फर्स्ट रिअल्टी जन्माला आली. आत्तापर्यंत मी ४० च्या वरती घरं विकलीत आणि १५ पेक्षा जास्त घरांसाठी property management करतेय. माझ्या काम करण्याच्या नीती पद्धतीने टॅम्पा फर्स्ट रिअल्टीची चांगली वाढ होते आहे. प्रामाणिकता आणि ग्राहकांचे समाधान हेच आमचे प्रयोजन आहे. आत्तापर्यंत मी माझ्या उद्योगाची किंवा माझी कुठेही जाहिरात केली नाहिये. माझा उद्योग आत्तापर्यंत पूर्णपणे word of mouth वर चालत आला आहे, आणी या वर्षी मंडळापासून मी जाहिरातीची सुरुवात करत आहे. माझे शाश्वत ग्राहक माझ्या उत्तम सेवेचे प्रतिक आहेत. माझ्या वेब साईट चे नाव TampaFirstRealty.com आहे. माझ्या कडे property management चे certification सुद्धा आहे. मी Chase बँकेची preferred रीअल्टर आहे आणि या व्यवसायात चांगल्यात चांगली सेवा पुरवण्यासाठी कटिबद्ध आहे.

*SONALI PATIL*
*TAMPA FIRST REALTY LLC*

# Congratulations !

**Dr. Eknath Naik, MD, PhD, FACP**



Dr. Eknath naik was felicitated at BMM event for Community Service Award.

Dr. Eknath Naik is the Assistant Director of Emergency Department and staff physician at James A. Haley VA Hospital, Tampa and is an Associate Professor in the Department of Global Health at University of South Florida.

He is the Co-founder and founding Director of the USF-India Center for HIV/AIDS Research and Training (CHART-India) since its establishment in the year 2000.

He developed the idea of establishing joint education and training programs between USF and the various local organizations in India. Indian physicians are sponsored to USF's campus in Tampa for training in the latest methods of HIV diagnosis, management and prevention and to learn best treatment practices. They then return to India to pass on their new knowledge to other physicians and nurses.

He is the founder and board member of Community Resource Foundation (CRF), a not-for-profit charitable organization, in the state of Goa. CRF's mission is to enhance overall community development through provision of quality education, vocational training and access to health care to needy people. CRF provides observership and volunteer opportunities for US and International students and health care professionals.

He has played major role in initiating and organizing free medical camps at Sanatan Mandir, Tampa, for Marathi Association and also served as the secretary of MMTB in the past.

He has been awarded Rashtriya Vikas Ratna Gold Award in 2005 from International Integration and Growth Society in New Delhi India for his contributions to India's health development and recognized with Community Service Award in 2012 by Federation of Indian Associations, Tampa.

He is a great resource person and advisor for our community.

# BMM महोत्सव २०१४

नमस्कार मंडळी,

चार मराठी माणसं एकत्र जमली की गप्पागोष्टी, विनोद, हास्याला किती ऊत येतो हे तुम्हाला वेगळ सांगायला नकोच. पण चार मराठी मंडळ एकत्र आली आणि तेही पहिल्यांदाच, की मात्र मज्जा काही औरच असते.

उत्तर अमेरिकेतील बृहन महाराष्ट्र मंडळ आणि त्यांची दर दोन वर्षांनी भरणारी अधिवेशने आपल्या सर्वांना जवळून परिचत आहेत. आपल्यापैकी बरेच जण प्रत्येक अधिवेशनाला अगदी आवर्जून जात असतील. पण कधीकधी अंतरामुळे किंवा बाकी काही वैयक्तिक कारणांमुळे ही संधी हुकते. यावरच BMM ने काढला एक उत्तम तोडगा म्हणजे BMM महोत्सव ! बृहन महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणीचे सदस्य श्री. अमोल फुलंबरकर यांच्या कल्पनेतून साकारलेला हा महोत्सव! BMM कार्यकारिणीचे अध्यक्ष श्री.सुनील सूर्यवंशी यांनी त्यांच्या वृत्तात म्हटल्याप्रमाणे, प्रांतिक पातळीवर चार, पाच मंडळांनी एकत्र येऊन कार्यक्रम करावेत, एकमेकांशी ओळखी वाढवाव्यात, स्थानिक कलाकारांना मोठा रंगमंच द्यावा, व हे सर्व करताना आपल्या हृदयात असलेल्या महाराष्ट्राला जपावे, आपला वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावा यासाठी हा प्रस्ताव सर्व मंडळांसमोर मांडला गेला. ओरलँन्डो मराठी मंडळाचे सदस्य श्री. प्रशांत सावजी यांनी पुढाकार घेऊन तो प्रस्ताव आपल्या फ्लोरिडातील , मायबोली मेळावा टॅम्पा बे, मराठी मंडळ साऊथ फ्लोरिडा, जॅकसनविल मराठी मंडळ, आणि ओरलँन्डो मराठी मंडळ या चार मंडळांसमोर आणला आणि चारही मंडळानी पहिल्याच phone call मधे तो अक्षरशः डोक्यावर उचलून धरला.

संकल्पना जूनमध्ये आमच्यासमोर आली. सर्व आयोजनासाठी वेळ थोडा कमी होता पण आपल्या Disney World चे निर्माते Sir Walt Disney यांनी म्हटलेच आहे " If you dream it, you can do it." हा महोत्सव आपल्या फ्लोरिडात झालाचं पाहिजे हे स्वप्न आणि तो जास्तीतजास्त मनोरंजक कसा होईल याबद्दलचे अनेक विचार, अनेक चर्चा आम्ही केल्या. विशेष सांगायचे म्हणजे, Tampa, Orlando, Jacksonville, Miami यातील मोठमोठ्या अंतरामुळे आणि कामाच्या व्यापांमुळे प्रत्यक्ष भेटून चर्चा करणे शक्यच नव्हते त्यामुळे आमच्या यासगळ्या चर्चा 'conference call' वरून झाल्या. पण खूप धमाल आली. सर्व मंडळांच्या प्रतिनिधींची उत्तम साथ मिळाली आणि म्हणूनच एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचा घाट घालता आला. सर्व वयाच्या रसिकांची आवड निवड लक्षात घेऊन सांकृतिक कार्याक्रमांची आखणी आम्ही केली. सजावटीपासून ते सर्वांच्या जिव्हाळ्याच्या भोजनापर्यंत प्रत्येक गोष्टीत आपलं मराठीपण जपण्याचा प्रयत्न केला. हे अवजड शिवधनुष्य, केवळ चार मंडळांनी एकत्रित येऊन केलेल्या मेहनतीमुळेच सहजपणे पेलता आले.

या शिवधनुष्याला प्रत्यंचा लावण्याचा दिवस होता ४ ऑक्टोबर २०१४. ओरलँन्डो येथे भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळ महोत्सवाला फक्त फ्लोरिडातूनच नाही तर बाहेरगावाहूनही अनेक मंडळी उपस्थित होती. ओरलँन्डोमधील नामवंत डॉक्टर रवी जहागीरदार या सोहोळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्याचप्रमाणे BMM कार्यकारिणीचे सदस्य श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. अमोल फुलंबरकर, सौ. अंजली अंतुरकर हे विशेष अतिथी उपस्थित होते. चारही मंडळांच्या बालकलाकारांनी मराठी अभिमान गीतावर केलेल्या कवायतीने आणि नृत्यांगनांनी केलेल्या गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरवात तर एकदम दणक्यात झाली. आणि नंतर एकापेक्षा एक बहारदार कार्यक्रमांनी महोत्सवाची रंगत वाढतच गेली. किती विविधता होती यात ! ओरलँन्डो मंडळाची दोन नाटुकली, 'उत्सव नात्याचा' हा नृत्याविष्कार होता, छोट्या बच्चेमंडळींचा जोशीला नाच होता, साऊथ फ्लोरिडा मंडळाच्या तर्फे मराठी गाण्यांची सुरेल मैफल, आणि' मंगळागौर' होती. 'संतवाणी' आणि 'गोंधळ' हे पारंपारिक कार्यक्रम जँकसनविलच्या मंडळाने अतिशय उत्साहाने सादर केले तर 'शिवस्वराज्यगाथा' या भव्यदिव्य कार्यक्रमाने आपल्या मायबोलीची मान उंच केली. आपल्या मंडळातर्फे श्री. अतुल तायवाडे यांच्या समर्थ नेतृत्वाखाली सुमारे पन्नास कलाकारांनी या कार्यक्रमात भाग घेतला होता. सर्व वयाच्या इतक्या मंडळीची प्रॅक्टिस जमवून आणणे, कार्यक्रमाचे संकलन, सवांदलेखन, नृत्यदिग्दर्शन, ध्वनीमुद्रण अशा अनेक आघाड्यांवर श्री. तायवाडे यांनी डॉ. राहुल म्हसकर, तेजस्विनी ठाकुर, दयाघन पेंढारकर यांच्या तसेच सर्व कलाकारांच्या, मायबोलीच्या इतर सदस्यांच्या सहकार्याने यशस्वीपणे बाजी मारली आणि संपूर्ण सोहोळ्यात वाहवा मिळवली.

आपापल्या क्षेत्रात अत्यंत यशस्वी असलेल्या पण समाजसेवेच्या कार्यातही मोलाची कामगिरी केलेल्या नागरिकांचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात ओरलँन्डो मंडळातील डॉ. शैलजा नाडकर्णी, आणि श्री. अनिल देशपांडे, मायामी मंडळातील श्री. सुनील देशमुख तर टॅम्पातील डॉ. एकनाथ नाईक यांना मानचिन्ह देऊन गौरवीले गेले.

बृहन महाराष्ट्र मंडळातर्फे खास नृत्य, विनोद, गाणी यांची रेलचेल असलेला 'मराठी तारका' हा कार्यक्रमही आयोजित केला होता. भारतीय चित्रपटसृष्टी आणि मराठी मालिकांतील सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी, स्मिता शेवाळे, संस्कृती बालगुडे, निवेदिका स्मिता गवाणकर, गायक मंगेश बोरगावकर, आणि विनोदवीर दीपक देशपांडे यासर्वांनी आपापल्या कला सादर करून बहार आणली. या संपूर्ण महोत्सवाची गोडी शेवटपर्यंत टिकवली ती अस्सल मराठमोळ्या जिलेबीच्या भोजनाने!

मंडळी, या वर्षी थोड्याशा  शंका मनात ठेऊन केलेला हा पहिलावहिला अभिनव प्रयोग. पहिलाच असल्यामुळे काही त्रुटी तर नक्कीच राहिल्या असणार. यापुढील कार्यक्रमात त्या सुधारण्याचे प्रयत्न हमखास होतील. तुम्ही मात्र असाच विश्वास, असेच प्रेम कायम ठेवा ही नम्र विनंती.

मेधा फडणीस

(मायबोली मेळावा कार्यकारिणी- सांस्कृतिक विभाग)







